संदर्भ क्र.________________ दिनांक : १४/०८/२०१४

# सतीश शेट्टी आणि नरेंद्र दाभोळकर खूनाच्या तपासासाठी ‘एसआयटी’ नेमण्याकरिता ‘धर्मराज्य पक्षा’चे धरणे आंदोलन

**प्रतिनिधी/ठाणे**

दि. १४ – माहिती अधिकार कार्यकर्ते सतीश शेट्टी आणि नरेंद्र दाभोळकर यांच्या खूनाच्या तपासासाठी न्यायालयाच्या अधिकार कक्षेत **‘एसआयटी’** (स्पेशल इन्वेस्टिगेशन टीम) स्थापन करावी, यासाठी **‘धर्मराज्य पक्षा’**च्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ दिवसभराचे **‘निषेध धरणे आंदोलन’** आयोजित करण्यात आले होते. या आंदोलनाचे नेतृत्त्व **‘धर्मराज्य पक्षा’**चे अध्यक्ष **राजन राजे** यांनी केले, यावेळी **‘धर्मराज्य पक्षा’**चे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

माहिती अधिकार कार्यकर्ते सतीश शेट्टी यांचा १३ जानेवारी-२०१० रोजी तळेगाव येथे खून करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे देण्यात आला. परंतु चार वर्षानंतर अचानक **‘सीबीआय्’**ने या खटल्याचा **‘क्लोजर रिपोर्ट’** न्यायालयात सादर केला आहे. यामुळे या प्रकरणातील गुन्हेगार सापडण्याची शक्यता मावळली आहे. शेट्टी प्रकरणात **‘आरआयूबी’**चे विरेंद्र म्हैसकर यांच्यावर शेट्टी यांच्या खूनातील सहभागाबाबत आरोप केला जात आहे. विरेंद्र म्हैसकर हे विद्यमान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे व्यावसायिक भागीदार आहेत. अशावेळी सीबीआयने खटल्याचा तपास बंद करण्यामागे सत्ताधारी नरेंद्र मोदी सरकारचा हात असल्याचे बोलले जात आहे. याचप्रमाणे अंधश्रध्दा निमूर्लन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या खूनाला वर्ष होत असतानाही पोलीसांना आरोपी सापडत नाहीत. उलट पोलीस **‘प्लँचेट’** प्रकरणात गुंतलेले दिसतात. यामागेही सत्ताधारी काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकार जबाबदार असल्याचे बोलले जात आहे. यामुळे सतीश शेट्टी आणि नरेंद्र दाभोळकर यांच्या खून प्रकरणाचा तपास करण्यासाठी न्यायालयाच्या देखरेखीखाली **‘एस्आयटी’** गठीत करण्यात यावी, अशी मागणी **‘धर्मराज्य पक्षा’**च्या शिष्टमंडळाने ठाणे जिल्हाधिकारी पी. वेलरासू यांना भेटून केली. यावेळी **‘धर्मराज्य पक्षा’**चे महासचिव अनिल ठाणेकर, ठाणे जिल्हा सचिव नरेंद्र पंडित, धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचे महासचिव महेशसिंग ठाकूर, सचिव रूपेश पवार आदी पदाधिकारी उपस्थित होते.